**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : रंगनाथ राजाराम दौंड,
वय : ५७ वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : लाखनगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके.**

१. घटना दि.०६/०९/२०२३ रोजी घडली. त्या दिवशी माझा मुलगा रसिक दौंड सकाळी ९.०० ते ९.३० च्या दरम्यान माझ्या नातीला शाळेत मोटर सायकलरवरुन सोडवायला गेला होता. तिला शाळेत सोडून तो घराकडे परत येत होता. त्यावेळी मागुन एक चारचाकी गाडी क्र.एम.एच.१४ ८०८७ आली व तिने जोरात माझ्या मुलाच्या मोटर सायकलला धडक दिली. त्यावेळी खुप मोठा आवाज झाला. मोटर सायकल ही चारचाकीच्या खाली गेली व दीडशे फुट खरडत पुढे आली. त्यावेळी माझा मुलाचा जागीच मृत्यू झाला.

२. कार चालकाचे सागर भिमाजी डोके असे होते. मी त्याला घटनास्थळी पाहिले होते. आज घटनेस दोन वर्ष झाल्याने आरोपीस पाहिल्यास ओळखता येणार नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपासः आरोपीतर्फे वकील श्री. एस. डी. मोरडे यांच्यामार्फत**

३. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झाले आहे. अपघात झाला तेव्हा मी घराशेजारी रस्त्याच्या कडेला होतो. माझ्या जबाबातील " मी घरामध्ये असतांना अचानक आवाज झाला, तेव्हा मी घराच्या बाहेर येऊन पाहिले त्यावेळी अपघात झालेला होता. " हा मजकुर खरा आहे. माझ्या मुलाकडे गाडी चालविण्याचा परवाना नव्हता. अपघाताच्या वेळी माझ्या मुलाने हेलमेट घातलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात झाल्यानंतर घटनास्थळी गेलो. मी कारचा नंबर घटनास्थळी पाहिला होता. मला माझा जबाब पोलीसांनी घरी सुध्दा वाचायला दिला

होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यानंतर नुकसान भरपाई मिळण्याकरीता खेड - राजगुरुनगर येथे मोटर एक्सीडंट क्लेम नं.७४/२०२३ हा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल होऊन आम्हाला नुकसान भरपाई मिळाली. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा हा नविन गाडी शिकत होता, त्यामुळे घराच्या जवळ आल्यानंतर वळण घेतांना त्याच्या चुकीमुळे सदर अपघात झाला. हे म्हणणे खरे नाही की, मी चारचाकीचा नं.एम.एच.१४ के.एस.८०८७ हा आहे असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर गाडीचा व आरोपीचा कोणताही संबंध नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला घटनास्थळी पाहिले व त्याचे नाव सागर भिमाजी डोके असे आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुलगा घराकडे येत असतांना मागुन एक गाडी नं.एम.एच.१४ के.एस.८०८७ आली व तिने माझ्या मुलाला धडक दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नुकसान भरपाई मिळण्याकरीता आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.२१/०१/२०२६**
**घोडेगाव**